



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २० वा | मंगळवार ०६ जून २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 20 | Date : 06/06/2023 | blow :Tuesday | Page 4 | Price 4


## राज्यातील आगामी सर्व निवडणुका शिवसेना-भाजप एकत्रित लढवणार

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

मुंबई : राज्यातील आगामी सर्व निवडणुका शिवसेना आणि भाजप एकत्र लढवणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची काल (४ जून) एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत भेट घेतली. त्यानंतर त्यांनी या भेटीचं फलित झाल्याचं ट्वीट केलं आहे. राज्याच्या विकासासाठी आमची युती ११ महिन्यांपासून काम करत आहे. पुढच्या काळात सर्व क्षेत्रात महाराष्ट्राला देशात प्रथम क्रमांकाचे राज्य बनवण्यासाठी, विकासाची घोडदौड कायम ठेवण्यासाठी आम्ही एकत्रित निवडणुका लढवणार आणि बहुमताने जिंकणार, असं मुख्यमंत्री शिंदे यांनी ट्वीट केलं आहे.



एकनाथ शिंदे यांनी ट्वीटमध्ये लिहिलं आहे की, काल, रविवारी रात्री मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांनी दिल्लीत केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांची भेट घेतली. कृषी, सहकार विभागाशी संबंधित विविध बाबींवर आम्ही चर्चा केली. राज्यात शेतकरी, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात गतीने कामे सुरु असून अनेक रखडलेले प्रकल्प मार्गी लावले आहेत. राज्यातील विविध प्रकल्पांसाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नेहमीच मार्गदर्शन लाभले आहे, सहकार विभागाशी संबंधित बाबींवर केंद्रीय सहकार मंत्री श्री. शाह यांचे आम्हाला नेहमीच मार्गदर्शन लाभत असल्याने आम्ही ही भेट घेतली. राज्यात आगामी सर्व निवडणुका (ज्यात लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा समावेश होतो) शिवसेना आणि भाजपने एकत्रितपणे लढविण्याचा निर्णय देखील या बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्राच्या विकासासाठी आमची युती ही भक्कम असून गेल्या ११ महिन्यांपासून आम्ही विकासाचे विविध निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली आहे, रखडलेले प्रकल्प मार्गी लावत आहोत. यापुढच्या काळात सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राला देशात प्रथम क्रमांकाचे राज्य बनविण्यासाठी, विकासाची घोडदौड अशीच सुरू ठेवण्यासाठी आम्ही एकत्रित निवडणुका लढविणार आणि बहुमताने जिंकणार.

तर महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) सर्व निवडणुका एकत्रित लढण्याचे ठरवल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दिली आहे. दोन्ही पक्ष फक्त निवडणुकाच एकत्रितपणे लढणार नाही तर त्यासाठी एकत्रित रणनीतीही तयार केली जाणार आहे. त्यासाठी दोन्ही पक्षात जिल्हा स्तरापासून तालुका स्तरापर्यंत समन्वय घडवले जाणार असल्याचे फडणवीस म्हणाले. मंत्रिमंडळ विस्तार होईलच, मात्र मंत्रिमंडळ विस्तार केव्हा होईल हे मुख्यमंत्री ठरवतील असे ही फडणवीस म्हणाले. नाना पटोले ज्या पक्षाचे प्रतिनिधी **पान २ वर**

## १९ जूनआधी राज्य मंत्रीमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता

नवी दिल्ली : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल दिल्ली दौऱ्यावर होते. या दौऱ्यात त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. १९ जून हा शिवसेनेचा वर्धापन दिन आहे. त्याआधी मंत्रीमंडळ विस्तार करावा असा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आग्रह आहे. त्यामुळे मंत्रीमंडळ विस्तार हा १९ जूनआधी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळात लवकरच फेरबदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची मानली जाते. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या फेरबदलानंतर राज्यातही मंत्रीमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मंत्रीपदासाठी इच्छुक शिवसेनेच्या आमदार आणि खासदारांचे या भेटीकडे लक्ष्य लागले आहे. ध्या राज्याच्या मंत्रीमंडळात एकही महिला आमदाराचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे शिंदे-फडणवीस सरकारवर टीका देखील झाली आहे. त्यामुळे आगामी मंत्रीमंडळ विस्तारात महिला आमदाराला संधी मिळण्याची शक्यता आहे.

त्याचप्रमाणे काही नवोदित आमदार देखील मंत्री होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नवीन आमदारांना मंत्रीपदाची संधी देण्यासाठी सध्याच्या मंत्रीमंडळातील काही आमदारांना डच्चू मिळण्याची शक्यता देखील आहे. मंत्रीमंडळातील काही चेहरे फारसा प्रभाव दाखवू शकले नाहीत. अशातच आगामी काळात लोकसभा आणि त्यानंतर लगेच विधानसभा निवडणुका असल्याने अशा चेहऱ्यांना मंत्रीमंडळातून बाजूला सारून त्या जागी नवीन आमदारांना संधी दिली जाऊ शकते.

## तुमच्या अस्तित्वाचा स्वीकार, हाच लोकशाहीचा खरा सन्मान

### मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे

मुंबई : पारलिंगी (तृतीयपंथी) समुदायातील व्यक्तींचा मतदार यादीत समावेश व्हावा यासाठी भारत निवडणूक आयोग वचनबद्ध असल्याचे राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी म्हटले आहे. आपला समाज एलजीबीटीआयक्यू समुदायाला समजून घेत आपलेसे करेल,तुमच्या अस्तित्वाचा स्वीकार, हाच लोकशाहीचा खरा सन्मान, असे मतही श्री. देशपांडे यांनी व्यक्त केले.




एलजीबीटीआयक्यू समुदायाच्या 'अभिमान महिन्या'निमित्त पुण्यातील 'युतक' या संस्थेच्या वतीने आणि द हमसफर ट्रस्ट, द ललित, केशवसुरी फाउंडेशन व बिंदू क्विअर् राइट्स फाऊंडेशन यांच्या मदतीने ४ जून रोजी पुण्यात ११ वी एलजीबीटीआयक्यू समुदायाची अभिमान पदयात्रा आयोजित करण्यात आली होती.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय आणि जिल्हा निवडणूक कार्यालय, पुणे हेही या पदयात्रेत सहभागी झाले होते. या अभिमान पदयात्रेमध्ये २००० लोक सहभागी झाले होते. तसेच सारथी ट्रस्ट नागपूर, अजिंक्य सातारा, नाशिक एलजीबीटीआयक्यू, नगर क्वीयर, पुणेरी प्राइड फाऊंडेशन, पुणे, पालकांचा 'सपोर्ट ग्रुप स्वीकार' मुंबई देखील यात सहभागी झालेला होता. याशिवाय **पान २ वर**

## मान्सूनपूर्वी 'बिपरजॉय' चक्रीवादळाचा धोका,

### वादळी वाऱ्यामुळे पाऊस लांबला

मुंबई : एकीकडे मान्सूनची प्रतिक्षा लागली असताना दुसरीकडे चक्रीवादळाचा धोका पाहायला मिळत आहे. अरबी समुद्रात 'बिपरजॉय' चक्रीवादळ निर्माण झाल्याने आता पाऊस आणखी लांबला आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या ताज्या माहितीनुसार, ५ जून रोजी दक्षिण पूर्व अरबी समुद्रात चक्रीवादळ तयार झालं. पुढील २४ तासांत याच प्रदेशात कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळाला 'बिपरजॉय' असं नाव देण्यात आलं आहे. मान्सून आधी 'बिपरजॉय' चक्रीवादळाचा धोका निर्माण झाल्याने पावसावरही परिणाम झाला आहे.

मुंबई हवामान विभागाने या संदर्भात ट्विट **पान २ वर**

## संत निवृत्तीनाथ पालखी दिंडी सिन्नरकडे रवाना, आज लोणारवाडीत मुक्काम

नाशिक : 'हाती टाळ, मृदूंग घेत, हरिनामाचा गजर' करत संत श्रेष्ठ निवृत्तीनाथांची पालखी पंढरपूरकडे रवाना झाली आहे. नाशिकमधून ही पालखी पुढे सिन्नरकडे मार्गस्थ झाली असून शिंदे पळसे येथील मुक्कामांनंतर आज पालखी सिन्नर तालुक्यातील लोणारवाडी परिसरात विसावणार आहे. त्यानंतर पुढे सिन्नर तालुक्यातुन दिंडीचे मार्गक्रमण होणार आहे.



संत निवृत्तीनाथ महाराज आषाढी वारी पालखी सोहळा २ जून रोजी त्र्यंबकेश्वर इथून पंढरपूरकडे प्रस्थान करण्यात आले. त्यानंतर त्र्यंबकेश्वर येथील महानिर्वाणी आखाड्यात यंदा पहिल्यांदाच मुक्काम करण्यात आला. त्यानंतर ३ जून रोजी दिंडी सोहेलनाशिक शहराकडे मार्गस्थ झाला. त्या दिवशी नाशिकच्या सातपूर परिसरात दिंडीचा मुक्काम झाला. ४ जून रोजी पायी दिंडी सोहळा नाशिक शहरात **पान २ वर**

## मुख्तार अन्सारीला आजीवन कारावास आणि एक लाखाचा दंड

नवी दिल्ली : गँगसटर मुख्तार अन्सारीला वाराणसीने एमपी-एमएलए कोर्टाने ३२ वर्षानंतर जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. गँगस्टर मुख्तार अन्सारीला अवधेश राय हत्याकांड प्रकरणी कोर्टाने शिक्षा सुनावली आहे. तसेच एक लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. अवधेश राय हत्याकांड प्रकरणी वारणसीच्या एमपी एमएलए कोर्टाने सोमवारी दोषी ठरवले. त्यानंतर लंच ब्रेकनंतर मुख्य निकाल दिला आहे. कोर्टाने हत्याकांडातील दोषी मुख्तार अन्सारी जन्मठेप सुनावली आहे. आयपीसीच्या कलम ३०२ अंतर्गत मुख्तार अन्सारी यांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. गेल्या वर्षभरात मुख्तार अन्सारीला वेगवेगळ्या चार प्रकरणात शिक्षा सुनावण्यात आली आहे

. परंतु अवधेश राय हत्याकांड प्रकरणी मुख्तार अन्सारीला सर्वात मोठी शिक्षा मिळाली आहे. आजीवन कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या हत्येप्रकरणी दोन साक्षीदारांनी कोर्टात आपली साक्ष नोंदवली. शिक्षा सुनावल्यानंतर अन्सारीने वयाचा विचार करता शिक्षा कमी करण्याची मागणी केली. अवधेश राय हत्याकांड प्रकरणी कोर्टाने गँगस्टर मुख्तार अन्सारीला दोषी ठरवत तब्बल ३२ वर्षांनी शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात मुख्तार अन्सारीसह पाच जण आरोपी आहेत. मुख्तार अन्सारी, भीम सिंह, कमलेश सिंह, राकेश माजी आमदार अब्दुल कलाम अशी आरोपींची नावे आहेत. दरम्यान या पाच आरोपींपैकी अब्दुल आणि कमलेश यांचा मृत्यू झाला आहे.

## रोजगारासाठी उपलब्ध संधींचा लाभ घ्या : ना.चंद्रकांत पाटील



पुणे : जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघात आयोजित महारोजगार मेळाव्यास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भेट दिली. रोजगारासाठी नवनवीन क्षेत्र उपलब्ध असून तरुणांनी मेळाव्याच्या माध्यमातून त्यांची माहिती करून घ्यावी आणि या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाला आमदार सुनिल कांबळे, माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, महेश पुंडे उपस्थित होते.पालकमंत्री म्हणाले, वर्षानुवर्षे पदवी शिक्षण म्हणजेच करिअरची सुरुवात अशी धारणा आहे. परंतु विविध प्रकारची कौशल्ये आत्मसात करण्यासाठी कमी कालावधीचे व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. त्यातूनही युवकांना स्वत:चा विकास साधता येईल. पारंपरिक प्रशिक्षणाशिवायही अनेक नवनवीन क्षेत्र उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.पाटील म्हणाले. राज्य शासनाच्यावतीने २८८ मतदार संघात 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली देण्यात येत आहे. तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघात करिअर मार्गदर्शन शिबीर व रोजगार मेळावे घेण्यात येत आहेत. लोकप्रतिनिधींनी शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवाव्यात, । **पान २ वर**

## समूह पुनर्विकास योजनेतून घरांची चावी मिळेल तो दिवस माझ्यासाठी परमोच्च आनंदाचा: ना.शिंदे

ठाणे : ठाण्यातील समूह पुनर्विकास योजनेचे काम सुरू करणे हे माझे स्वप्न आहे. सुमारे १५०० हेक्टर जमिनीवर वेगवेगळ्या टप्प्यात हा प्रकल्प उभारण्यात येणार असून पहिल्या टप्प्यात सुमारे १० हजार घरांची निर्मिती होणार आहे. हा एक ऐतिहासिक प्रकल्प होणार आहे. ज्या दिवशी या योजनेतील घराची चावी नागरिकांना मिळेल तो दिवस माझ्यासाठी सर्वात परमोच्च आनंदाचा दिवस असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

अनधिकृत व अधिकृत धोकादायक इमारतींचा पुर्नविकास करण्यासाठी आखलेल्या ठाण्यातील समूह विकास योजनेच्या (क्लस्टर) कामाचा शुभारंभ आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. यावेळी मुख्यमंत्री महोदयांच्या सुविद्य पत्नी श्रीमती लता शिंदे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा ठाण्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) व अन्न नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण मंत्री रविंद्र चव्हाण, कृषीमंत्री अब्दुल सत्तार, खासदार कुमार केतकर, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, माजी आमदार रविंद्र फाटक, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, महानगरपालिका आयुक्त अभिजित बांगर आदी उपस्थित होते.




किसन नगर येथील समूह विकास योजनेच्या कामांची सुरुवात १९९७ मध्ये पडलेल्या साईराज इमारतींतील रहिवासी दाम्पत्यांच्या हस्ते पूजा करून करण्यात आली. यावेळी क्लस्टर योजनेच्या लोगोचे अनावरण मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते झाले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, १९९७ मध्ये ठाण्यातील साईराज इमारत पडल्यानंतर अनधिकृत धोकादायक इमारतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू केले. अनधिकृत इमारती या गरजेपोटी बांधल्या होत्या. घरे अनधिकृत असली तरी माणसे तर अधिकृत होती. त्यामुळे या घरांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी तेव्हापासून अनेक आंदोलने, संघर्ष केले. आज कित्येक वर्षानंतर या योजनेचे काम सुरू होत आहे. ही योजना मार्गी लागण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री तथा सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेकांचे सहकार्य लाभले. ठाण्यातील या क्लस्टर योजनेचे काम आता सुरू झाले असून इमारती पूर्ण होईपर्यंत ते काम सुरू राहिल. या योजनेत नुसतेच इमारती उभ्या राहणार नाहीत, तर येथे मोकळी मैदाने, उद्याने, आरोग्याच्या सुविधाही असतील. एक सुनियोजित शहर उभारण्याचे आमचे स्वप्न आहे. सिडकोद्वारे बांधण्यात येणाऱ्या घरांच्या दर्जा पेक्षाही चांगल्या गुणवत्तेची घरे येथे उभारण्यात येतील. अधिकृत इमारती व सध्या सुरु असलेल्या पुनर्विकास योजनेतील इमारतींना या क्लस्टर योजनेत समावेश हा ऐच्छिक ठेवला असून यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेऊ, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

ठाण्याप्रमाणेच मुंबईसह मुंबई महानगर प्रदेशातील मीराभाईंदर, कल्याण, भिवंडी आदी क्षेत्रातील अनधिकृत धोकादायक इमारतींच्या **पान २ वर**

## ✻ सुविचार ✻

माणसाचे प्रेम हे धरती सारखे असते अगोदर एक दाणा पेरावा लागतो.

## संपादकीय

### अदानी समुहावरील आरोप..

सर्वोच्च न्यायालयाने एक तज्ज्ञ समिती नेमली. या समितीने आपला अहवाल सादर केला. हा अहवाल चक्रावून टाकणारा आहे. चक्रावून म्हणण्यापेक्षा नेमकी काय चौकशी झाली याची चौकशी करायला एक समितीच नेमणे योग्य ठरेल. कारण समितीने जो अहवाल दिला आहे, तो अहवाल अप्रत्यक्षपणे अदानीचे कौतुक करणारा आहे. त्यामुळे या चौकशीच्या टोपीखाली नेमके काय दडले आहे याचे गूढ कायम आहे. भारतीय शेअर बाजाराला आव्हान देणारी घटना याच वर्षी जानेवारी महिन्यात घडली. जगप्रसिध्द अशा हिंडेनबर्ग संस्थेने अदानी समूहावर गंभीर आरोप केले. अदानी समूहाची उलाढाल, गौतम अदानी यांची संपत्ती याची गणिते मांडण्यात आली. नियमानुसार म्हणा अथवा अजून काही सूत्र मांडा हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात जाऊन पोहोचले. न्यायालयाने आधी स्वतः गोष्टी समजून घेतल्या. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीसुध्दा अदानी प्रकरणावरुन अनेकवेळा संसदेत मोदी सरकारला घेरले होते. या प्रकरणाबाबत मोदी सरकारचे मौन बरेच काही सांगून जाते, अशी खरमरीत टीका राहुल यांनी केली होती. इतकेच नव्हे तर इतर विरोधी पक्षांनीसुध्दा या प्रश्नावरुन संपूर्ण देशात रान पेटवले होते. त्यामुळे केंद्र सरकारची गोची  ाली होती. अदानीवर आरोप झाल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्था अस्थिर झाली नाही. छोट्या गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात अदानी समूहात गुंतवणूक केली, असा दावा या अहवालात करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे वर्चस्व आणि त्यांचा अभ्यास सर्वच विषयात आहे. पवार विरोधकांमधील पहिले असावे ज्यांनी अदानी समूहाच्या संसदीय चौकशी समितीला थेट विरोध केला. कोण हिंडेनबर्ग, मी ओळखत नाही. आमच्या काळातही उद्योग समूहांवर असे आरोप होत होते, अशी भूमिका पवार यांनी मांडली. नंतर पवार यांनी घूमजाव केले. सर्व विरोधकांची इच्छा असेल तर होऊ द्या अदानी समूहाची चौकशी, असे पवारांनी स्पष्ट केले. त्यानंतर अदानी यांनी थेट पवार यांचीच भेट घेतली. जवळपास दोन तास उभयतांमध्ये चर्चा झाली. या चर्चेचा तपशील समोर आलेला नाही. या बैठकीनंतर अदानी समूहाची चर्चा थोडीशी निवळली. न्यायालयीन चौकशी समितीच्या अहवालानंतर अदानी समूहाला बळ मिळाले आहे. परिणामी अदानी समूहाच्या टोपीखाली नेमके दडले आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो.

# शिव राज्यभिषेक
## समता व सन्मान



छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक हा भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण घटना आहे. मराठा साम्राज्याचे पहिले राजे म्हणून त्यांचा राज्याभिषेक झाला. छत्रपती शिवरायांच्या राज्यभिषकां बद्दल अनेक समज गैरसमज निर्माण झालेले आहेत. परंतु छत्रपतींचा राज्यभिषेक हा केवळ राजसत्ता मिळवण्यासाठी केलेला सोहळा नव्हता तर राज्यभिषेक हा सर्वसामान्य लोकांनामध्ये समता प्रस्थापित करून सर्वसामान्य लोकांचा सन्मान वाढविण्याचा दिवस आहे. छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अगोदरची व नंतरची परिस्थिती बघणे आवश्यक आहे. तरच आम्हाला छत्रपती शिवाजी महाराज समजू शकतात. आज पर्यंत बऱ्याच स्वयघोषीत इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास चुकिच्या पद्धतीने व ब्राह्मण श्रेष्ठतेशी जोडलेला आहे. छत्रपती शिवरायांच्या नंतर काळात छत्रपती शिवरायांना मुस्लिम द्वेषी म्हणून कलम कसायांनी मांडणी करून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने तरुणांना आक्रमक बनवले जात आहे. मुळात छत्रपती शिवाजी महाराज हे विज्ञानवादी दृष्टिकोन बाळगणारे असल्याने वैदिक पद्धतीने राज्यभिषेक का केला? यावर काही स्वंयघोषीत इतिहासकार सांगतात छत्रपती शिवाजी महाराज गोब्राम्हण प्रतिपालक होते. मुळात छत्रपती शिवाजी महाराज हे ब्राह्मण प्रतिपालक नव्हते ही बाब निनाद बेडेकर यांच्या लिखाणातून दिसून येते. निनाद बेडेकर म्हणतो की छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यभिकांच्या वेळी पापक्षालन करण्यासाठी तुला विधी केला होता. हा विधी करण्यामागे जे काही ब्राह्मण चुकुन छत्रपतींच्या हातुन मारले गेले त्याविषयी हा विधी. थोडक्यात यातही ब्राह्मण वर्चस्व व श्रेष्ठत्व दाखवण्याचा प्रयत्न केला गेला. दुसरी गोष्ट निनाद बेडेकर याच्याच मताचा विचार केला तर छत्रपती शिवाजी महाराजांनी यांनी ब्राम्हणांच्या हत्या केल्या होत्या म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराज ब्राम्हणप्रतीपालक नव्हते हेच सिद्ध होते. छत्रपती शिवरायांनी ब्राम्हणांच्या हातुन राज्यभिषक करून घेतला तो केवळ राज मान्यतेसाठी. आजही अनेक लोक ब्राह्मण विधीलाच सर्वस्व माणतात. त्याकाळी तर ब्राह्मणांचे वर्चस्व होतेच. राज्यभिषेकानंतर मात्र ब्राम्हणी विचार धारेच्या विरोधात छत्रपती शिवरायांनी काम केले. बहुजन समाजातील जेष्ठ व संशोधन इतिहासकार मा. म. देशमुख सरांच्या मता नुसार आम्हाला पाच टक्के ही खरा इतिहास सांगीतला जात नाही आणि जो काही सांगितला जातो तो केवळ ब्राम्हणश्रेष्ठ दाखवण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु छत्रपतींच्या राज्यभिषका नंतर समता बंधुता न्याय व स्वातंत्र्यावर आधारित समाज व्यवस्था निर्माण झाली. शेतकरी व सैन्याच्या कल्याणाचे निर्णय घेण्यात येऊन त्यांना सक्षम करण्याचे ध्येयधोरणे आखल्या गेली. जाती व्यवस्था नष्ट करून मावळा या शब्दांने ओळख निर्माण केली. जात धर्म न पाहता कला व क्षमते नुसार कामाची विभागणी केली. थोडक्यात छत्रपती शिवरायांचे राज्य केवळ सत्ता उपभोगण्यासाठी नाही तर सर्व सामान्य लोकांना संधी, समता, व सन्मान देण्यासाठी होते. छत्रपती शिवाजी महाराज राजा असुनही शिस्त व उत्तम प्रशासन म्हणून काम करत होते. ते स्वतः राजे असुनही कधी स्वतः ला राजे समजत नसत. गुन्हेगारांना गुन्हा बघुन शिक्षा दिली जात होती. मान्सून पुर्ण शेतकऱ्यांना सर्व सुविधा पुरवल्या जात होत्या. शेती विषयी कामासाठी बिनव्याजी कर्ज दिले जात होते. स्त्रियांचा सन्मान व सामाजिक समता होती. औरंगजेब मुसलमान असला तरीही स्वतः चे अंगरक्षक मुस्लिम होते. याचा अर्थ छत्रपतींचे स्वराज्य धर्मावर नाही तर कर्मावर आणि निष्ठेवर होते. म्हणुनच राजेशाही असतानाही लोकांना ते रयतेचे स्वराज्य वाटू लागले. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे हजारो वर्षांपासून बहुजन समाजाला जे हक्क अधिकार नाकारले त्याच बहुजन समाजासाठी उद्धारकर्ते म्हणून छत्रपती शिवरायांची छबी होती. छत्रपतींच्या काळात जनता सुखी व समाधानी होती. छत्रपती शिवाजी महाराज न्यायीक व जनकल्याणकारी होते. राजे अजूनही सर्व सामान्य लोकांचे कल्याण केले. आज जर याच छत्रपतींच्या देशात बघितले तर लोकशाही आहे. अगदी छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीमध्ये जशी व्यवस्था होती तीच व्यवस्था लोकशाही मध्ये आहे. राजेशाही जाऊन लोकांची सत्ता आली व जनकल्याण करण्यासाठी लोकसेवक आले. परंतु ह्या लोकसेवकांनी छत्रपतींची व्यवस्था नाकारून अप्रत्यक्ष पणे हुकुमशाही करण्याचा प्रयत्न केला. शेतकरी व सर्वसामान्य जनता त्रस्त आहे. शेतकरी समस्या ग्रस्त आहेत. लोकसेवक असताना ही हे स्वतः ला स्वतः चे सरकार असल्यासारखे वागुन स्वतः च्याच नावाने सरकार शब्द वापरतात. आरोपींना शिक्षा ही आरोप बघुन नाही तर जात बघुन होते. मावळा शब्द बाजूला करून धार्माच्या नालाखाली तेढ निर्माण केली जाते. प्रशासनामध्ये शिस्त व समजामध्ये समता, बंधुता स्वातंत्र्य व न्याय दिसत नाही. विज्ञानवादी असलेल्या छत्रपतींच्या राज्यात अज्ञान अंधश्रद्धा पसरवून लोकांना माणसिक गुलाम बनवले जाते. लैंगिक शोषणाचे आरोप असलेल्या लोकांना सरंक्षण दिले जाते. जे लोकशाही मध्ये लोकांना मिळायला पाहिजे ते मिळत नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवशाहीमध्ये लोकशाही सारखे जनकल्याण होते. म्हणून लोकशाही मध्येही छत्रपती शिवाजी महाराज वंदनीय आहेत. छत्रपती शिवरायांच्या राज्यातच छत्रपतींच्या नावाने धार्मिक तेढ निर्माण करतात. छत्रपती शिवाजी महाराज काल्पनिक शक्ती नाही वा मनोरंजनाची कथा नाही. ते जिवन जगण्याचा समता बंधुता न्याय व स्वांतत्र्याचा मार्ग आहे. अन्याय अत्याचारी व्यवस्थेविरुद्ध लढण्याची ताकद छत्रपती शिवाजी महाराज आहेत. स्वतः च्या जनतेसाठी जिव पणाला लाऊन काम केले. आजचे राज्येकर्ते जनतेला लुटून स्वतः चे घर भरतात. छत्रपती महान व वंदनीय का आहेत तर ते जनकल्याणकारी व मानवतावादी होती. स्त्रियांचा सन्मान करून शेतकऱ्यांचे हीत जोपासणारे होते. शिवशाहीमध्ये जसी व्यवस्था होती तशी आज आहे का हे आपल्याला बघणे व त्याचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवरायांचा एक राज्यभिषेक झाला आणि बहूजन समाजातील लोकांचा उद्धार झाला. छत्रपती शिवराय हे दोन व्यवस्थेशी लढत होते एक म्हणजे परकीय मोघल व दुसरे म्हणजे अंधश्रद्धा विषमता वर आधारित असलेल्या व्यवस्थे विरोधात. आज परकीय शत्रु नाहीत परंतु आजचे राज्येकर्ते परकीय शत्रुपेक्षा जास्त लुट शोषण करून अन्याय अत्याचार करत आहेत. जे की शिवाजी महाराज यांनी अन्याय अत्याचारी शोषण करणाऱ्यांना कठोर शिक्षा केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य आदर्श होते व याच स्वराज्याला व छत्रपती शिवाजी महाराज यांना औपचारिक मान्यता देण्याचा दिवस म्हणजे राज्यभिषेक दिन होय. राज्यभिषेक झाल्या मुळे बहूजन समाजाला हक्क अधिकार तर मिळालाच आणि सन्मानही मिळाला. राजा असूनही हक्क अधिकार सन्मान देणारे उदार मनाचे राजे हे जागतिकच होते. आणि त्याच राजाच्या नावावर धार्मिक राजकारण करून विषमता जोपासणाऱ्या आणि जनतेच्या हक्काच्या पैशावार डल्ला मारणाऱ्या राजकीय प्रवृतींना ठेसले पाहिजे तरच समाजात छत्रपतींचे विचार रूजून छत्रपतींचा सन्मान होईल. छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्यभिषेक म्हणजे विषमता वादी व्यवस्थेच्या व स्वतःला श्रेष्ठ समजणाऱ्या लोकांच्या व्यवस्थेला सुरुंग होता. लोकांना जातीधर्माच्या नावाखाली नावाखाली विभागून स्वतः ची पोळी भाजुन घेण्याची बंद पडत होती. कारण मावळे म्हणून सर्वांना एकत्र आणण्याचे काम केले. मानसन्मान देऊन विषमता नष्ट केली. राजा असुनही लोकशाही प्रमाणे राज्यकारभार करून प्रत्येकांच्या लहान मोठ्या समस्या अगदी कमी वेळात सोडवून जनतेचे कल्याण केले. अंधश्रद्धा पाखंड झुगारून विज्ञानवादाला चालणा दिली. संरक्षण, यूद्ध कौशल्य, प्रशासन, नियोजन, संघटक म्हणून छत्रपती शिवाजी महाराज हे कुशल होतेच परंतु सर्व गुण संपतीचा वापर रयतेसाठी करून जागतिक कार्य केले. परंतु छत्रपती शिवाजी महाराज ज्यांना राजा होणे मान्य नव्हते त्या लोकांनी छत्रपतींना मर्यादित करण्याचा प्रयत्न केला. परंतु छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व विविर एका जातीत आणि एका पुस्तकात बंद करणे शक्य नाही. छत्रपतींच्या कार्याची व विचाराची दखल इंग्रजी लेखक ल इतिहासकारांनी घेतली आहे. म्हणून ते जागतिक होते आणि राहतील यात शंकाच नाही. बाळ शिवाजी ते छत्रपती शिवराय यामध्ये महत्वाची घटना म्हणजे शिव राज्यभिषेक होय. राज्यभिषकांमुळे त्यांना औपचारिकता मान्यता मिळाली व बहुजन समाजातील लोकांचे कल्याण झाले. शत्रूच्या महिलांचाही सन्मान करणाऱ्या व आरोप बघून शिक्षा ठोठावणाऱ्या राजाचा राज्यभिषेक बहुजन समाजासाठी आनंदाचा व समतेचा तसेच राष्ट्रहीताचा दिवस होय. शिवराज्याभिषेक दिनांच्या बहुजन समाजाला मंगलमय सदिच्छा..

जय जिजाऊ जय शिवराय..

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### राज्यातील आगामी सर्व निवडणुका

करतात त्या पक्षात प्रातःविधीसाठीही हायकमांडची दिल्लीहून परवानगी घ्यावी लागते. आम्ही तर राष्ट्रीय पक्ष आहोत. त्यामुळे आम्ही दिल्लीला गेलो तर काय वाईट आहे, असा प्रश्न विचारुन फडणवीस यांनी नाना पटोले यांच्या टीकेला जोरदार प्रतिउत्तर दिलं. दरम्यान, अहमदनगरमध्ये काही समाजकंटकांनी औरंगजेबाचे फोटो दाखवल्याच्या मुद्द्यावर देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली. औरंगजेबाचे फोटो जर कोणी दाखवत असेल तर हे मान्य केले जाणार नाही. या देशांमध्ये, महाराष्ट्रामध्ये आमचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज असू शकतात, कोणी औरंग्याचे नाव घेत असेल तर त्याला त्या ठिकाणी माफी नाही असे फडणवीस म्हणाले.

### तुमच्या अस्तित्वाचा स्वीकार..

या चळवळीला समर्थन देणाऱ्या अनेक संस्था मासूम, कनेक्टिक, विदुला सायकोलॉजी कन्सल्टन्सी, यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज, ८ पेक्षा अधिक कॉर्पोरेट कंपन्यांनी या अभिमान यात्रेमध्ये सहभाग घेतला.

महाराष्ट्र निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक अधिकारी श्री. देशपांडे या पदयात्रेसाठी ग्रॅण्ड मार्शल म्हणून चालले. देशात प्रथमच एक सरकारी कार्यालय अशा प्रकारच्या पदयात्रेत सहभागी झाले होते. पारलिंगी व्यक्तींना मतदानाचा हक्क मिळावा आणि त्याचबरोबर मतदान कार्ड मिळावे यासाठी श्री. देशपांडे यांचे प्रयत्न उल्लेखनीय आहेत. कोणताही दस्तऐवजाशिवाय सहज पद्धतीने मतदान कार्ड मिळावे यासाठी यांनी दोन दिवसांचे शिबिर आयोजित केलेले होते. निवडणूक अधिकारी यांच्यासोबत पोलिस भरतीसाठी पात्र ठरलेल्या दोन पारलिंगी व्यक्तींनी सहभाग घेतला.‘लोकशाहीतील सर्वसमावेशकता आणि आदर’ ही या अभिमान पदयात्रेची संकल्पना होती. त्या निमित्ताने पारलिंगी व्यक्तींची मतदार नोंदणी, आणि त्यांच्या लोकशाहीतील समावेशनाविषयी समाजात जाणीव–जागृती करण्याच्या उद्देशाने राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रथमच या अभिमान पदयात्रेत सहभाग घेतला होता.

### संत निवृत्तीनाथ पालखी दिंडी

दाखल झाला. मोठ्या उत्साहात ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. याचवेळी वरुणराजाने देखील हजेरी लावली. यावेळी वारकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. त्यांनतर ५ जून रोजी दिंडी पुढील मार्गासाठी मार्गस्थ झाली. त्या दिवशीचा मुक्काम हा नाशिक सिन्नर मार्गावरील पळसे या गावी झाला.

दरम्यान आज सकाळी पुन्हा एकदा वारकऱ्यांनी पळसे गावातून नागरिकांची ऊर्जा घेत वारीला सुरुवात केली. खांद्यांवर भगवी पताका, हाती टाळ, मुखाने विठ्ठलनाम घेत मार्गक्रमण करणारे वारकरी तर डोक्यावर तुळशी वृंदावन आणि मंगल कलश घेतलेल्या माताभगिनींची रस्त्याने वर्दळ पाहायला मिळाली. ठिकठिकाणी भाविकांसह वारकऱ्यांनी संत निवृत्तीनाथांसह ज्ञानोबा तुकारामचा जयघोष करत विठ्ठलमय वातावरणात स्वागत करण्यात येत आहे. मुक्कामाच्या ठिकाणी ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येते. त्या दिवशी गावकऱ्यांकडून दिंडीसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येते. ठिकठिकाणी भाविक विसावा घेतात. संत निवृत्तीनाथांच्या पालखीला विसावा देतात. त्याचबरोबर रात्री कीर्तनाचा कार्यक्रम करत विठ्ठलनामाचा गजर केला जातो.

दरम्यान आज सकाळी पळसे इथून 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम' असा गजर करत पंढरीच्या दिशेने कूच करत निघालेल्या पालखीला उपस्थित ग्रामस्थांनी मोठ्या भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. यानंतर पालखी आज सिन्नर तालुक्यातील लोणारवाडी या गावात विसावणार आहे. आज जवळपास वीस किलोमीटरचे अंतर कापून संत निवृत्तीनाथ पायी दिंडी सोहळा सिन्नर तालुक्यातील लोणारवाडी गावात पोहोचणार आहे. तर दुसऱ्या दिवशी म्हणजेच सात जून रोजी संत निवृत्तीनाथ पायी दिंडी दातली गावात पोहचणार असून इथे पहिले उभे गोल रिंगण होणार आहे.

### समूह पुनर्विकास योजनेतून घरांची

क्लस्टर योजनेचा मार्ग मोकळा केला आहे. मीरा भाईंदरमधील क्लस्टर योजना दिवाळीनंतर सुरू होईल, असेही मुख्यमंत्री महोदयांनी

यावेळी सांगितले. मुंबईतील रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पासाठी आवश्यक तेथे नियमात बदल करून आता असे प्रकल्प शासनामार्फत राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी सिडको, म्हाडा, एमएमआरडीए, महाप्रित, एसआरए आणि अन्य सर्व गृहनिर्माण संस्थांची मदत घेऊन हे प्रकल्प पूर्ण करण्यात येतील, असेही श्री. शिंदे यांनी सांगितले.

हे शासन सर्वसामान्यांचे सरकार आहे. गेल्या अकरा महिन्याच्या काळात सर्वसामान्यांसाठीच निर्णय घेण्यात आले आहे. थांबलेल्या प्रकल्पांना या सरकारने चालना दिली असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

खासदार श्री. केतकर म्हणाले की, पत्रकार असल्यापासून ठाण्यातील क्लस्टरचा संघर्ष पाहिलेला आहे. ही योजना सुरू होईल की नाही, याविषयी शंका होती. मात्र, आता ही योजना प्रत्यक्षात सुरू होत असल्याचा आनंद आहे. पूर्वी ठाण्याला खेडेगाव समजत होते. मात्र, आता या योजनेमुळे ठाण्याला मुंबईचा दर्जा मिळेल.

आमदार श्री. केळकर म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेश मोठ्या वेगाने वाढत आहे. येथील नागरिकांना चांगल्या सुखसोई देण्याचे काम या शासनाच्या काळात होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली क्लस्टर योजनेला चालना देण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. क्लस्टर योजनेचे काम मार्गी लावण्यासाठी श्री. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री व्हावे लागले. ठाण्यातील विविध भागातही ही योजना राबविण्याची गरज आहे.

मिनी क्लस्टर योजनेची अनेक भागात गरज असून शासनाने यावर विचार करावा. यावेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांनी मनोगत व्यक्त केले तर महापालिका आयुक्त श्री. बांगर यांनी प्रास्ताविकात क्लस्टर योजनेची माहिती दिली.

गेल्या अनेक वर्षांपासून येथील नागरिक ज्याची वाट पाहत आहेत, तो क्लस्टर योजनेच्या कामांची सुरुवात होण्याचा दिवस आज आला आहे. आज ठाणेकरांच्या भाग्याचा दिवस आहे. ठाणे शहरात शौचालये दुरुस्ती, सौंदर्यीकरण, रस्ते विकासाची अनेक कामे सुरू आहेत. मुख्यमंत्र्यांचे बदलते ठाणे उपक्रमातून ठाणे शहराचा चेहरा बदलत असल्याचे श्री. बांगर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांना जमिनीचे ताबा पत्रे देण्यात आली तर  महाप्रितचे बिपीन श्रीमाळी यांना करारनामा पत्र देऊन गौरविण्यात आले. याशिवाय या योजनेसाठी सहकार्य करणाऱ्या महापालिका आयुक्त श्री. बांगर, वास्तुविशारद हाफिज कॉन्ट्रॅक्टर, संजय देशमुख, विशेष सल्लागार मंगेश देसाई यांच्यासह जमिन मालकांचा मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अनधिकृत व अधिकृत धोकादायक इमारतीचा सामूहिक पुर्नविकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री  श्री. एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून नियमावली तयार करण्यात आली आहे. या योजनेच्या कामाची सुरूवात अंतिम भूखंड क्र. १८६/१८७ या वरील ७७५३ चौ.मी क्षेत्रफळावरील भूखंडावर त्याचप्रमाणे रस्ता क्रमांक २२ लगतचा भूखंड क्रमांक एफ – ३ या ठिकाणी १९२७५ चौ.मी. एवढ्या जागेवर करण्यात येणार आहे.

नागरी पुनरुत्थान १ व २ ची अंमलबजावणी  सिडकोमार्फत होणार आहे. त्याचप्रमाणे समूह विकास योजनेचे कामकाज सांभाळण्यासाठी कशिश पार्क येथे क्लस्टर पुनर्विकासचे कार्यालय निर्माण करण्यात आले आहे. या प्रशस्त कार्यालयाचे उद्घाटनही मुख्यमंत्री श्री. शिंदे हस्ते झाले.

### रोजगारासाठी उपलब्ध संधींचा

असे आवाहन त्यांनी केले.ते म्हणाले, यावर्षी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्य शासनाचे ७५ हजार नागरिकांना नोकरी देण्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र शासनाने परदेशात उच्च शिक्षणासाठी जाण्याकरता दरवर्षी ३० लाख रुपये शिष्यवृत्ती जाहीर केली आहे. पाच वर्षामध्ये दीड कोटी रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. युपीएससीच्या तयारी राज्य शासनामार्फत दिल्ली येथे शिक्षणाची व राहण्याची सोय करण्यात येते. एमपीएससीसाठी गरीब मुलांचे शुल्क शासन माफ करते. तरुणांनी शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही पालकमंत्र्यांनी केले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते विविध कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध झालेल्या तरुणांना नियुक्तीपत्र देण्यात आले. तसेच दहावी, बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

महारोजगार मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. यावेळी लोकप्रतिनिधी, युवक–युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वारस नोंद लावण्याच्या दृष्टीने प्रत्येक तालुक्यात विशेष मोहीम
#### पालकमंत्री उदय सामंत

रत्नागिरी : जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरता आपण कटिबद्ध असून याचे दृश्य परिणाम नागरिकांना लवकरच दिसून येतील त्यासाठी नागरिकांनी थोडा संयम ठेवावा. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या वारस नोंदीचा प्रश्न लवकरच निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी वारस नोंद लावण्याबाबत दिनांक १२ ते ३० जून या कालावधीत तहसीलदारांच्या सहायाने एक विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात असलेल्या अल्पबचत सभागृहात आज ‘जनता दरबाराचे’ आयोजन करण्यात आले होते.  यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हाधिकारी एम.देवेंदर सिंह, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी किर्तीकिरण पुजार, अपर जिल्हाधिकारी शुभांगी साठे अपर पोलीस अधीक्षक जयश्री गायकवाड, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालिका श्रीमती नदिनी घाणेकर, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. ओटवणेकर आदी उपस्थित होते.यावेळी जिल्ह्यातील विविध तालुक्यातून आलेल्या तक्रारदारांच्या अडचणीची सोडवणूक पालकमंत्र्यांनी अतिशय आस्थेवाईकपणाने केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# अक्षय भालेराव यांची निर्घृण हत्या केल्याबद्दल गुन्हेगारांवर कडक कारवाई : राजाभाऊ सरवदे

सोलापूर/प्रतिनिधीः नांदेड येथील अक्षय भालेराव यांची निर्घृण हत्या केल्याबद्दल गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची मागणी व सदर घटनेचा जाहीर निषेध करीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाच्या वतीने राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले महाराष्ट्र राज्यातील,नांदेड जिल्ह्यातील मौजे बोंढार हवेली या गावात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करून,गावातून मिरवणूक काढली म्हणून गावातीलच,जातीयवादी १० ते १२ गावगुंडानी,समाज कंटकांनी अक्षय भालेराव याची निर्घृण हत्या केली त्याचा भाऊ,आई,वडील यांना ही मारहाण केली.एवढेच नव्हे तर बौद्ध वस्तीवर दगडफेक करून दहशत निर्माण केली.ही बाब अत्यंत संताप जनक असून स्वातंत्र्याच्या,७५ वर्षानंतर सुद्धा जातीयवाद मिटलेला नाही याची




प्रचिती येते. या बाबत निवेदन देण्यात आले त्यात १)सदर घटनेची उच्चस्तरीय (सी.आय.डी/एस.आय.टी) चौकशी करण्यात यावी.२)अक्षय भालेराव यांना व त्यांच्या कुंटुबियांना न्याय मिळावा यासाठी सदरचा खटला जलदगती न्यायलयात चालविण्यात यावा. ३)अक्षय भालेराव यांच्या कुटुंबियांना जास्तीत जास्त आर्थिक मदत महाराष्ट्र सरकारने करावी. ४) त्यांच्या कुटुंबातील एका सदस्यास शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे.असे मागणी करण्यात आले आहे.सदर मागण्या महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्याचे सूचित यावेळी करण्यात आले.

सदर घटनेचा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करून गुन्हेगारावर कडक कारवाई करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली,तसेच आरोपींना कडक कारवाई न झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांनी दिला. प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे समन्वय समितीचे अतुल नागटिळक,राजेश उबाळे,श्याम धुरी,पवन थोरात,सुशील सरवदे,विकास सरवदे,अमोल वामने,शिवराज पुल्लुर,शिवम सोनकांबळे,जीवन हिप्पर्गीकर,श्रीनिवास सरवदे,सुमित शिवशरण,बंटी गायकवाड,अभि तीर्थे,गणेश शिंदे,चंदू सकट,बापू कापूरे आदी उपस्थित होते.

# स्वेरीत 'ॲश्रे मेंबरशीप अँड करीअर अपॉर्चुनीटीज' या विषयावर सेमिनार संपन्न




पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर ता.पंढरपूर येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली 'ॲश्रे मेंबरशीप अँड करीअर अपॉर्चुनीटीज' या विषयावर एक दिवशीय सेमिनार नुकताच संपन्न झाला. ॲश्रे पुणे चॅप्टरच्या प्रेसिडेंट सौ.अनुश्री रिसवडकर, प्रेसिडेंट इलेक्ट. यश कारखानीस व इनबाक (आयएनबीएसी) संस्थेच्या प्रेसिडेंट सौ.सखी चंद्रायन हे याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. 'अमेरिकन सोसायटी फॉर हिटींग, रेफ्रिजरेटींग व एअर कंडिशनींग' या आंतरराष्ट्रीय संघटनेची एक विद्यार्थी शाखा स्वेरी मध्ये २०१९ सालापासून कार्यान्वित आहे. दरवर्षीप्रमाणे यंदा देखील विद्यार्थ्यांना 'ॲश्रेचे सदस्य होण्याचे फायदे व रेफ्रिजरेशन क्षेत्रात करिअर संधी' याबाबत माहिती देण्यासाठी हा सेमिनार ठेवण्यात आला होता. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे प्रमुख डॉ.श्रीकृष्ण भोसले व कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागातील प्रा.प्राजक्ता सातारकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले. स्वेरीच्या अश्रे ब्रँचचे मार्गदर्शक प्रा.दिग्विजय रोंगे यांनी ब्रँच तर्फे घेण्यात आलेले विविध कार्यक्रम व उल्लेखनीय कामगिरीबद्दल सविस्तर माहिती दिली. यश कारखानीस यांनी ॲश्रे बद्दल तसेच ॲश्रेचे सदस्य झाल्यानंतर होणारे फायदे व त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या बाबींवर प्रकाश टाकला. 'ॲश्रेद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील आंतरराष्ट्रीय स्तरावर करीअर घडवू शकतात.' असे त्यांनी प्रतिपादन केले.

सौ.सखी चंद्रायन यांनी 'आयुष्यात यशस्वी होण्यासाठी लागणार्या जीवन कौशल्यांवर' महत्वपूर्ण भाष्य करताना म्हणाल्या की 'तांत्रिक माहिती बरोबरच प्रोब्लेम सॉल्विंग, कम्युनिकेशन व कॅरॅक्टर ह्या गोष्टी आयुष्यात खूप उपयोगी पडतात.' ॲश्रे स्वेरी स्टुडंट ब्रँचचे विद्यार्थी शुभम यमगार व आकांक्षा शेळके यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले तर ब्रँचचे मार्गदर्शक प्रा.दिग्विजय रोंगे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# वागदरीत एका शेळीने दिला तिन पायाच्या पिल्लाला जन्म

## आईचे वात्सल्य आणि अपंगत्वावर मातकरूण जगण्याची धडपड शेळी आणि पिल्लू एकत्र आले की जाणवते



नळदुर्ग /एस.के.गायकवाड : ऐकावे ते नवलचं अस म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. निसर्गात अशा चमत्कारी घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत. कधी शेळीने तिन तर कधी कधी पाच पिल्लांना जन्म दिल्याचे समजते. त्यात भर म्हणून की काय वागदरी ता.तुळजापूर येते एका शेळीने चक्क तिन पायाच्या मादी पिल्लाला (पाट)जन्म दिल्याची घटना घडली आहे.जेंव्हा शेळी आणि पिल्लू एकत्र आले की आईचे वात्सल्य आणि अपंगत्वावर मातकरूण जगण्याची धडपड जाणवते. याबाबत माहिती आसी की वागदरी तालुका तुळजापूर येथील श्रीदेवी बाबासाहेब वाघमारे यांनी आपल्या संसारात काही तरी मदत होईल म्हणून एक शेळी पाळली आहे. त्या शेळीने या आगोदर एक पाट एक बोकड असा दोन पिल्लांना जन्म देवून चा सहा महिन्यात दहा अकरा हजार रुपये मिळवून दिले आहे. त्याच शेळीने नुकतेच एका तिनपायाच्या पाटीला जन्म दिला असून पिल्लू आणि त्याची आई सुरक्षित आहेत.पिल्लू म्हणजे शेळीने जन्म दिलेली पाट (मादी पिल्लू) जगणसाठी धडपडत असुन ते पिल्लू आई जवळ ठेवले की ते दुध पिण्यासाठी धडपडत ऊठून उभे राहून दुध पित आहे.आई म्हटलं की प्रेम,माया,जिव्हाळा, वात्सल्य ह्या बाबी आल्याच मग मणूस प्राणी असो की पशू पक्षी असोत आईची आपल्या लेकरावरची माया सारखीच असते. जेंव्हा हे पिल्लू आई जवळ येते तेंव्हा आपल्या अंपग लेकराकडे पाहून शेळीचे अंतकरण दु:खानाने भरून येत असेल आईच्या वात्सल्याच्या भावनां उफाळून येत असतील असे त्या शेळीच्या एकंदरीत हालचाली वरुन दिसून येते. आईच्या अंतकरणातून मिळणाऱ्या प्रेमातून प्रेरणा घेऊन तिन पायाचे पिल्लू जगण्यासाठी,जिवनाचा आनंद घेण्यासाठी धडपडताना दिसते आहे.

# किल्ल्यांचे जतन, संवर्धनावर भर देणार : पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा

## सिंधुदुर्ग, विजयदुर्ग किल्ल्यांच्या प्रमाणबद्ध प्रतिकृतींच्या प्रदर्शनाचे पर्यटनमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



मुंबई : राज्यातील गडकिल्ले इतिहासाचे साक्षीदार असून नव्या पिढीला त्याचे महत्त्व समजावे यासाठी किल्ल्यांचे जतन आणि संवर्धनावर राज्य शासन भर देत आहे. अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघही किल्ले जतन, संवर्धनासाठी उत्कृष्ट कार्य करत आहे, असे मत पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी व्यक्त केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्ष सोहळ्यानिमित्त सिंधुदुर्ग, विजयदुर्ग किल्ल्यांच्या प्रमाणबद्ध प्रतिकृतींचे प्रदर्शन मंत्रालयात भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन पर्यटन मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करण्यात आले.प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाचे अध्यक्ष माधव फडके, कार्याध्यक्ष ऋषिकेश फडके उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या सिंधुदुर्ग, विजयदुर्ग किल्यांच्या प्रमाणबद्ध प्रतिकृती प्रदर्शनात ठेवण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर या दोन्ही किल्ल्यांचा इतिहास, आरमाराची माहिती देण्यात आली आहे. सोमवार दि. ५ जून ते मंगळवार दि. ६ जून २०२३ या दोन दिवसांच्या कालावधीत हे प्रदर्शन शिवप्रेमींना पाहता येणार आहे. या प्रदर्शनाची निर्मिती अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण महासंघाने केली आहे.


# बादशहाच्या कारकिर्दी पासून टाकळीवाडी मध्ये बेंदूर आजतागायत मोठ्या उत्साहात संपन्न

टाकळीवाडी/नामदेव निर्मळेः टाकळीवाडी तालुका शिरोळ येथे बादशहाच्या कालखंडापासून बेंदूर हा सण मोठ्या उत्साहात संपन्न केला जातो. बैल मालक कुंतीनाथ आवटी, कर मालक दादासो बंडू चौगुले, व श्रीकांत बंडू चौगुले, पूजेचे मानकरी ठरले आहेत.शितल जयपाल सोबाने, कोमल शितल सोबाने, रा. बोरगाव तालुका निपाणी जिल्हा बेळगाव हे मानकरी ठरले. चौगुले व खोत हे गावामध्ये इनामदार आहेत. दरवर्षी मोठ्या उत्साहात बेंदूर हा सण साजरा केला जातो. बेंदूर हा सण मोठ्या आनंदाने, उत्साहाने, गुण्या गोविंदाने, गावांमध्ये आज तागायत सुरू आहे. बैलाला स्वच्छ आंघोळ घालून बैलाला कलर केला जातो. त्याच्या गळ्यात लिंबाचा हार



घातला जातो. नवीन गळ्यामध्ये दोरीचे कडे घातला जातो. पूजा केली जाते. त्यानंतर दोन्ही बैलाचे दोरी सोडून ऐशी मध्ये करीसाठी आणले जाते. व कर सोडली जाते. यावेळी संपूर्ण गावकरी, लहान बालके, वयोवृद्ध ,महिला, पुरुष, मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शब्दकोडे क्र १९



आडवे शब्द २. दोन सागरांना जोडणारी चिंचोळी प्रवाह ५. उत्पत्ती, जन्म ८. युधिष्ठिर १०. राजकारणी डावपेच ११. अपयश घेऊन माघारी येणे १३. वर्ष १५. दरवाजा १६. निकड १७. दोन्ही १९. वानराची जात २१. अवैध मार्गाने येणाऱ्या लक्ष्मीचे वाहन २५. कार्यक्रम २७. कमी होणे २८. खळबळजनक २९. संन्याशी ३१. पशूप्रमाणे ३३. चिन्ह ३५. चिंता ३६. उसाचा रस काढण्याचे पारंपरिक साधन ३८. टिंगल ३९. बँड बरोबर वाजवण्याचे वाद्य? ४०. लेखनपद्धती ४२. निर्णय, तड ४४. बरोबरी, माळ ४५. धाक ४७. उन्हाळ्यातला त्रास ४८. मदत ५०. माता ५२. अग्नी ५४. अरण्य ५५. खिळा (संस्कृत) ५७. 'भेटीलागी जीवा, लागलीसे आस...' ५९. प्रहर ६१. वस्त्र ६३. मृत्तिका ६४. लोणच्यातील असल्यास चटकदार ६५. छिद्र ६६. काळवीट याचाच प्रकार ६८. '-- आज माझी नसे साथ द्याया' ६९. तणाव ७०. आप्त ७१. पती व पत्नीची आई ७२. पुष्कळ ७३. अनाठायी खचर ७५. भूकंप ७७. सरकारी अधिकारी ८०. जाड भाकरी ८३. खात्री ८४. उदासी, मनाची मरगळ ८६. सुखरूप ८९. इसम ९१. धान्य पिकवणारी जमीन ९३. नाजूक ९४. डोळ्याच्या उघड्या भागावरील गोलाकार पारदर्शक आवरण ९५. नवीन ९६. नामांकित ९९. चामखीळ १००. मजकुराच्या तळाशी दिलेला संक्षिप्त खुलासा किंवा टीप १०१. विनयी १०२. मूर्खपणे सादर केलेले मत-विचार १०३. सीता

उभे शब्द १. शेकडा प्रमाण २. अनुरूप ३. धन ४. धुके ५. विष ६. दमयंतीचा पती ७. नूतन ८. कोथिंबिरीच्या बिया ९. गाढव १२. पोटाला लागलेली रग १४. लहान १५. खट्याळ १७. पाणी व जमीन दोन्हीकडे राहू शकणारा १८. सातू १९. तरट २०. प्रेमात पाडणारे, मोहक २२. पदोन्नती २३. मौनव्रत धारण केलेला २४. करंगळीजवळचे बोट २६. पिछेहाट ३०. किनारा ३२. सहापैकी थंडीत येणारा ऋतू ३३. जनता ३४. कळी ३७. मिळकत ३९. डझन ४१. त्रास ४२. आकाशाचा रंग ४३. छोटा ४४. कापसाचे बी ४६. ओळखीची व्यक्ती भेटल्यावर अभिवादनाचे खास मराठमोळे शब्द ४७. पूर्व दिशा ४९. कन्या ५०. द्वेष ५१. विड्यातील एक घटक ५२. पार्वती ५३. पायताण ५४. आसाममधील प्रसिद्ध अभयारण्य ५६. क्षार, मीठ ५८. स्तुती ६०. शासनाचे उत्पन्न ६२. अकबराच्या दरबारची खासियत ६७. ज्वर ६८. लाडका ६९. धातूचा तंतू, धुंदी ७०. मचूळ ७१. शांतता ७३. अविरत ७४. वेदना ७६. निर्धन ७८. पत्नी ७९. व्यवसाय ८१. बंगाली मिठाईचा प्रकार ८२. भरधाव ८४. शेतीचे पारंपरिक औजार ८५. चंद्रदर्शन होणारी अमावस्या ८७. तांबडा ८८. शोध ८९. उपमर्द ९०. प्रिय व्यक्तींची भेट ९१. अखेरीस ९२. हे बाळले की सुंठ बनते ९५. पाण्याची तोटी ९७. लोक ९८. लाह्या, वैदिक लग्नातील एक विधी- -- होम ९९. पुष्परस

# सर्वसामान्य वंचितांना न्याय देणारे कर्तव्यदक्ष कोल्हापूरचे जिल्हाधिकारी राहुल रेखावर



कोल्हापूरचे जिल्हाधिकारी मा.राहुल रेखावार साहेब कर्तव्यदक्ष तसेच जरा सुद्धा पदाचा गर्व नसलेले सर्वसामान्य व्यक्तिमत्व म्हणून परिचयास आले आहेत. मी स्वतः त्यांच्याबद्दल अनुभवलेले आहे. मी नामदेव निर्मळे व माझ्या दोन्ही कन्या स्वरा निर्मळे व शौर्या निर्मळे आमची तिघांची नाकाला जीभ लावण्याची कला आहे. दिनांक २९ /११ /२०२१ रोजी त्यांच्याकडे अभिनंदन पत्र स्वीकारण्यासाठी गेलो होतो.

अतिशय हळू आवाजामध्ये व अतिशय नम्रपणे त्यांनी माझ्या दोन्ही मुलींना नाव ,गाव ,व तुमची कला कशी सुरुवात झाली. असे प्रश्न नम्रपणे करत होते. मला सुद्धा आश्चर्याचा धक्का बसला. एक जिल्हाधिकारी असून सुद्धा अहो, जावो, या शब्दात त्यांचे बोलणे ऐकून मला सुद्धा त्यांच्याबद्दल आदर वाटला. मुलींना त्यांची कला सादर करण्याची विनंती केली. मुलींनी कला दाखवली. त्यांनी दोघी मुलींचे भरभरून कौतुक केले. त्यांना सुद्धा या कलेचे आश्चर्य वाटले. वय लहान कीर्ती महान असे ते बोलले. एखादे घरचे सभासद आहेत. असे समजून ते आमच्याशी वागत होते. आम्ही स्वतः बघत होतो प्रत्येकाची समस्या ते ऐकून घेऊन घेत होते.यातच त्यांचा मोठेपणा कळतो. असे जिल्हाधिकारी साहेब आपल्या कोल्हापूर जिल्ह्याला लाभले हे फार चांगली गोष्ट आहे. सर्वसामान्य जीवन त्यांच्याकडे आहे मूळचे नांदेड जिल्ह्यातील साधी राहणी.सर्वसामान्य नागरिक प्रत्येकाचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य तो निर्णय घेणारे.

लहान बालकापासून ते वयोवृद्ध पर्यंत सर्वांना आदराने बोलवणारे एक दिलखुलास व्यक्तिमत्व म्हणून आज त्यांची ओळख निर्माण झाली आहे.प्रत्येक नागरिकाची समस्या ऐकून त्यांना मार्गदर्शन करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व तसेच साधी राहणीमुळे ते जिल्हाधिकारी आहेत असे सुद्धा वाटत नाही. जरासुद्धा भेदभाव न करता भेटायला येणाऱ्या नागरिकांची दखल घेतली जाते हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. असे व्यक्तिमत्व चुकूनच आयुष्यात भेटतात हा एक आलेला अनुभव आहे. नाहीतर अनेक प्रकारचे लोक भेटतात. आम्हाला त्यांच्या सानिध्याचा सहवास लाभला हे माझे माझ्या मुलींचे नशीब म्हणावे लागेल. कर्तव्यदक्ष प्रामाणिकपणा हे प्रत्येकाकडे नसते. हे आलेला अनुभव आहे. असे साहेब यांना आमच्याकडून खूप खूप शुभेच्छा आहेत.यांना दीर्घायुष्य लाभो. व असेच अधिकारी जन्माला येवो हीच सदिच्छा. व आमच्याकडून त्यांना मानाचा मुजरा..!

**– नामदेव निर्मळे, टाकळीवाडी कोल्हापूर**

# राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारने देशसेवेची ९-वैभवशाली वर्षे पूर्ण

## तालुक्यात विविध कार्यक्रम राबविण्यात येणार : आमदार कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनीधी : पंतप्रधानांच्या श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) सरकारने देशसेवेची ९-वैभवशाली वर्षे पूर्ण केली आहेत.यानिमित्ताने आज अक्कलकोट येथे जिल्हा अध्यक्ष आ. श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी पत्रकारांशी संवाद साधला.यावेळी त्यांनी केंद्र सरकारने ह्या ९ वर्षात देशात व अक्कलकोट विधानसभा मतदार संघात केलेल्या विकासकामाविषयाची माहिती पत्रकार परिषदेत सांगितली.



अंतोदय - शेवटच्या मैलाच्या व्यक्तिपर्यंत पोहोचणे या मूळ तत्वज्ञानाने प्रेरित होऊन केंद्र सरकारने सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण ही त्यांची मार्गदर्शक तत्वे बनवली आहेत. आमच्या सरकारने जगातील सर्वात मोठी लसीकरण मोहीम राबवली, कमीत कमी वेळेत २२० कोटींहून अधिक कोविड लसीचे डोस दिले. केंद्र सरकार ८० कोटींहून अधिक भारतीयांना मोफत रेशन पुरवत आहे. आमच्या सरकारने ४९ कोटी जन धन खाती, आयुष्मान भारत योजनेंतर्गत ५० कोटी आरोग्य कव्हरेज आणि ११ कोटी पीएम किसान लाभार्थींद्वारे सर्वासाठी आर्थिक समावेशन सुनिश्चित केले आहे.

आमच्या सरकारने 'हर घर जल' आणि अमृत योजनेंतर्गत आतापर्यंत १२ कोटींहून अधिक कुटुंबांना पिण्याचे पाणी यशस्वीरित्या पुरवले आहे, स्वच्छ भारत योजनेंतर्गत १२ कोटींहून अधिक शौचालये बांधली आहेत, १० कोटींहून अधिक एलपीजी कनेक्शन्सचे वाटप केले आहे, आणि प्रधानमंत्री आवास अंतर्गत ३.५ कोटी घरे वितरित केली आहेत. योजना योजना. कल्याणकारी योजनांमध्ये पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी, आमच्या सरकारने डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (DBT) प्रणाली विकसित केली आणि डिजिटल पेमेंट सिस्टम - UPI आणि BHIM द्वारे अर्थव्यवस्थेत व्यापक पारदर्शकता सुनिश्चित केली.

तरुणांचे सक्षमीकरण सुनिश्चित करण्यासाठी, गेल्या नऊ वर्षांत देशात ७०० हून अधिक वैद्यकीय महाविद्यालये, ३९० नवीन विद्यापीठे, 9 IIT, 9 IIM, १५ नवीन IIIT, १००० खेलो इंडिया केंद्रे आणि ९३०४ जन औषधी केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. जनधन, आधार आणि मोबाईल या JAM त्रिमूर्तीच्या माध्यमातून केंद्र सरकारने आमचे कल्याण लोकसंख्येच्या प्रत्येक वर्गापर्यंत पोहोचवले आहे. गेल्या नऊ वर्षांत आपल्या सरकारने देशात प्रामाणिक, पारदर्शक आणि स्थिर सरकार देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. यामुळे २०१३ मधील तथाकथित नाजूक पाच अर्थव्यवस्थांमधून भारत आज जगातील टॉप फाइव्ह अर्थव्यवस्थेत बदलला आहे.

सबका साथ सबका विकास च्या माध्यमातून सर्वसमावेशक राजकारणामुळे सर्व भारतीयांचे जीवनमान सुधारले आहे. केवळ भारतीय नागरिकच नाही तर जगभरातील लोक आज भरभरात होत असलेली अर्थव्यवस्था आणि एक स्थिर, शांततापूर्ण जग सुनिश्चित करण्यासाठी नेतृत्व प्रदान करण्यासाठी भारताकडे पाहत आहेत.

या पत्रकार परिषदेस भाजप जिल्हा सरचिटणीस आप्पासाहेब बिराजदार,जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर यादवड, तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड, शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, तालुका उपाध्यक्ष आप्पासाहेब पाटील,तालुका सरचिटणीस प्रदीप पाटील,पक्षनेते महेश हिंडोळे,उपनगराध्यक्ष यशवंतराव धोंगडे, जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस प्रदीप पाटील,तालुका युवा मोर्चा अध्यक्ष दयानंद बमनली उपस्थित होते.

# नियोजनबद्ध स्वामींच्या दर्शन व्यवस्थेमुळे वटवृक्ष मंदिराच्या नावलौकिकाचा जगभरात विस्तार : मा.मंत्री जितेंद्र आव्हाड

अक्कलकोट/प्रतिनिधी : येथील वटवृक्ष निवासी श्री स्वामी समर्थांचे भक्तगण देशभर व जगभरात आहेत. या पार्श्वभूमीवर स्वामी दर्शनाकरिता अक्कलकोटला पोहोचण्यासाठी दळणवळणाच्या भक्कम व मूलभूत सोयी सुविधा निर्माण झाले असल्याने स्वामी भक्तांची अक्कलकोटला येण्याची संख्या अलीकडील काळात वाढत चाललेली आहे. या येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांना सर्वोत्कृष्ट बद्ध नियोजन करून सुलभ स्वामी दर्शनाची संधी भाविकांना कशाप्रकारे उपलब्ध करून देता येईल यासाठी मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे हे नेहमीच प्रयत्नशील असतात. हे त्यांच्या स्वामी सेवेतून आम्ही पाहिलेले आहे. भक्ती, सेवा, उपक्रम हा मुलमंत्र जोपासून महेश इंगळे हे नियमितपणे स्वामी सेवेकरिता वेळ व्यतीत करीत असतात.



त्यामुळे येथे येणारे सर्व स्वामीभक्त समाधानाने स्वामींचे दर्शन घेऊन माघारी जातात. या आधारे येथील नियोजनबद्ध स्वामी दर्शन व्यवस्थेमुळे वटवृक्ष मंदिराच्या नावलौकिकाचा विस्तार जगभरात झाला असल्याच मनोगत राज्याचे माजी मंत्री आ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी जितेंद्र आव्हाड व कुटुंबीयांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला.

यावेळी माजी मंत्री आव्हाड बोलत होते. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, शिवराज स्वामी, सर्फराज शेख, रुद्रय्या स्वामी, गिरीश पवार इत्यादी उपस्थित होते.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश सत्र २०२३ साठी १,५४,३९२ जागांवर प्रवेश दिले जाणार

मुंबई : शालांत प्रमाणपत्र परिक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर झालेला असून राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Crafts-man Training Scheme) ऑगस्ट २०२३ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया (Centralized Online -dmission Process) पध्दतीने करण्यांत येत आहे. दहावी उत्तीर्ण झालेला विद्यार्थ्यांचा एक मोठा वर्ग औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेशाची आतुरतेने वाट पाहत असतो. यावर्षी एकूण ४१८ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५७४ अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधुन अनुक्रमे ९५,३८० व ५९,०१२ अशा एकूण १,५४,३९२ जागांवर प्रवेश दिले जाणार आहेत.

यावर्षी प्रवेशासाठी उपलब्ध व्यवसायांची संख्या ८३ असून त्यामध्ये पारंपरिक इलेक्ट्रिशियन, फिटर, मेकॅनिक मोटर व्हेईकल, डिझेल मेकॅनिक, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग टेक्निशियन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट, वेल्डर यासारख्या लोकप्रिय व्यवसायांबरोबरच नव्याने सुरू होणाऱ्या एरोनॉटिकल स्ट्रक्चर अँड इक्विपमेंट फिटर तसेच ड्रोन टेक्निशियन यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असलेल्या व्यवसायांचा समावेश करण्यात आलेला आहे.

उपलब्ध जागांपैकी ५३६०० जागा मुलींसाठी राखीव असून इतर प्रवर्गनिहाय आरक्षणानुसार अनुसूचित जातींसाठी २००७२, अनुसूचित जमातीसाठी १०८०८, इतर मागासवर्ग २९३३५, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक १५४३९, विमुक्त जाती ४६३१, भटक्या जमाती (ब) (क) व (ड) यासाठी अनुक्रमे ३८५९, ५४०४ व ३०८८ एवढ्या जागा उपलब्ध आहेत. याचबरोबर अल्पसंख्यांक उमेदवारांसाठी २५४८, दिव्यांग उमेदवारांसाठी ७७१९ व खुल्या गटातील उमेदवारांसाठी ६१७५६ जागा उपलब्ध आहेत.

२०२३ या वर्षापासून नव्याने २५७ तुकड्यांना डीजीटी, नवी दिल्ली यांचेकडून संलग्नता प्राप्त झालेली असून या व्यवसायांमध्ये प्रवेश देण्यात येणार आहेत. यामुळे महाराष्ट्र राज्याच्या प्रवेश क्षमतेमध्ये ५१४० एवढ्या भरघोस जागांची वाढ झालेली आहे. या वर्षभरात ड्युअल सिस्टीम ऑफ ट्रेनिंग अंतर्गत नव्याने ३० तुकड्यांना मान्यता प्राप्त झालेली असून या माध्यमातून प्रशिक्षणार्थ्यांना थेट औद्योगिक आस्थापनांमध्ये जाऊन सुमारे सहा महिने एवढ्या कालावधीपर्यंतच्या प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. यामुळे या प्रशिक्षणार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा होईल.

वर्ष २०२३ मध्ये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था नाशिक व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे येथे एरोनॉटिकल स्ट्रक्चर अँड इक्विपमेंट फिटर या व्यवसायाच्या प्रत्येकी दोन तुकड्यांना डीजीटी, नवी दिल्ली यांचेकडून संलग्नता प्राप्त होणे अपेक्षित असून यातील प्रत्येकी एका तुकडी मध्ये प्रवेश दिले जाणार आहेत. याचबरोबर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अकोला (मुलींची), धुळे, पुणे (मुलींची), सांगली, नाशिक, जालना, अमरावती, नागपूर, मुलुंड, अंबरनाथ, गडचिरोली, घनसावंगी अशा एकूण १२ संस्थांमधून ड्रोन टेक्निशियन या व्यवसायामध्ये नव्याने प्रवेशाला सुरुवात होणार आहे या व्यवसायाच्या माध्यमातून भारत ड्रोन टेक्नॉलॉजी या तंत्रज्ञानात आत्मनिर्भर होण्यास मदत होणार आहे अशी माहिती व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ.दिगांबर दळवी यांनी दिली आहे.

# मनसेच्या वतीने वागदरीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




वागदरी/ एस.के.गायकवाड : महाराष्ट्र नवनिर्माण सेना शाखा वागदरी ता.तुळजापूर च्या वतीने वागदरी येथील इ.१०वी आणि इ.१२ वी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. नुकतच इ.१० वी आणि १२ वी बोर्ड परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून या परीक्षेत वागदरी ता.तुळजापूर येथील उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन मनसे वागदरी शाखेच्या वतीने शाखा प्रमुख गणेश बालाजी बिराजदार यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा निव्रत्त मुख्याध्यापक शिवाजी मिटकर गुरुजी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मनसे शेतकरी सेना जिल्हा अध्यक्ष शाहुराज माने,तंटामुक्त अध्यक्ष राजेंद्र पाटील, ह.भ.प.सुरेशसिंग परिहार आदी होते. मान्यवरांच्या स्वागता नंतर इ.१० वी व १२ वी बोर्ड परिक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ व शालेय साहित्य देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन माजी उपसरपंच दत्ता सुरवसे यानी केले.

या वेळी शेतकरी संघटनेचे प्रदिप जोशी,मनसेचे प्रमोद कुलकर्णी, सुरज चव्हाण, खंडु कुंभार, आविनाश पवार,सुहास येडगे,वागदरी चे उपसरपंच मिनाक्षी बिराजदार, ग्रा.प.सदस्य सुरेखा यादव,गुनाबाई बनसोडे, माजी उपसरपंच मुक्ताबाई वाघमारे, सिआरपी विद्याताई बिराजदार, किशोर सुरवसे, नेताजी माडजे,रामसिंग परिहार, बालाजी बिराजदार,तुकाराम बिराजदार,आधुनिक लहुजी शक्ती सेनेचे प्रणाल कांबळे, ओंकार मुळे पत्रकार एस.के.गायकवाड, किशोर धुमाळ सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रत्येक नागरिकाने पर्यावरणाचे रक्षण आणि पोषण करावे : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

मुंबई : लोकसंख्येचा वाढता वेग पाहता जैवविविधता संवर्धनाचा वेग कमी आहे. अशा परिस्थितीत मानवाने स्वत:चा विचार न करता पर्यावरण रक्षणाचाही विचार करावा. पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धनाचे काम आनंद, ऊर्जा आणि उत्साह निर्माण करणारे आहे. त्यामुळे प्रत्येकाने पर्यावरणाचे रक्षण आणि पोषण करावे, असे आवाहन वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय विभागाचे मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी येथे केले.



जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्य शासनाच्या महसूल व वन विभागातर्फे आयोजित आभासी प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित करण्यात आले होते. यावेळी वन विभागाचे प्रधान सचिव वेणुगोपाल रेड्डी, सामाजिक वनीकरण विभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षक डॉ. सुनीता सिंग, अपर मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, शोमिता बिस्वास, क्लेमेन्ट बेन आदी उपस्थित होते. मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी प्रदर्शनाची पाहणी करून 'ग्रीन स्टेप' या पॉइंटवर सेल्फी घेतली.

मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, जागतिक पर्यावरण दिवस पर्यावरण संवर्धनाचे संकल्प करणारा दिवस आहे. वन विभागाने आयोजित केलेल्या आभासी प्रदर्शनाची संकल्पना नाविन्यपूर्ण आहे. अशाच प्रकारे वन विभागाने प्रत्येकाच्या मनामनांत वन विभागाचे महत्व रुजवावे. सर्वे ऑफ इंडियाने अलिकडे केलेल्या सर्वेक्षणात राज्यात २५५० चौरस किलोमीटर हरित क्षेत्र वाढले आहे. याशिवाय १०४ चौरस किलोमीटर कांदळवनाची भर पडली आहे. कांदळवनाचा उपक्रम आता देशभर राबविण्यात येणार आहे. तसेच वाघांच्या संख्येतही भर पडली आहे. आता वन विभागाच्या माध्यमातून 'अमृत वन, पंचायत वन' उपक्रम राबविण्यात येणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या कामात प्रत्येक नागरिकाचा सहभाग मोलाचा आहे. शुद्ध हवा मिळण्यासाठी प्रत्येकाने लावलेले एक रोप सुद्धा भव्य- दिव्य काम ठरणार आहे, असेही मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले.

आभासी प्रदर्शनाचे उद्घाटन

मंत्रालयातील वन विभागाच्या डिस्प्लेमध्ये पर्यावरण व वन्यजीव संवर्धन तसेच पर्यावरणविषयी जागरूकता निर्माण होण्यासाठी नवीन फ्रेम तयार करण्यात आली आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून नागरिकांना वन आणि पर्यावरणविषयीची माहिती देण्यात येणार आहे. प्रदर्शनाचे स्वरूप मिआयामी (आभासी) असल्याने त्यात नैसर्गिक वनांचा आभास होईल. तसेच एका आभासी घड्याळाच्या माध्यमातून वेळेबरोबर होणारे नैसर्गिक घटनाक्रम व त्यात बदल दर्शविले जाणार आहेत.

# अक्षय भालेराव च्या मारेकऱ्याला फाशीची शिक्षा द्या.. अक्कलकोट वंचित बहुजन आघाडीची मागणी

## तहसीलदार माननीय बाळासाहेब शिरसाठ यांना निवेदन

अक्कलकोट /प्रतिनिधीः एक जूनला नांदेड शहरालगत बडोरा हवेली या गावात गावामध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी का केली? याचा राग मनात धरून मनुवादी जातीयवादी लोकांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती होण्याकरिता जो पुढाकार अक्षय भालेराव यांनी घेतला होता शासन दरबारी पाठपुरावा करून भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्ष झाली तरीही त्या गावांमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होत नव्हती म्हणून अक्षय भालेराव हा पोलीस भरतीचा परीक्षेचा सराव करणारा तरुण शासन दरबारी सर्व कायदेशीर परवानगी घेऊन बढोरा ह वेली या गावात जयंती साजरी केला होता,. त्याचाच राग मनात धरून कट कारस्थान करून अक्षय भालेराव याचा निर्घृण पणे हत्या करण्यात आली या ह त्याच्या कटामध्ये अनेक जण असून त्यांना त्वरित अटक करावी अक्षय भालेरावाचा केस जलद गती न्यायालय स्थापन करून त्यामध्ये लवकरात लवकर केस निकाल काढावा आणि पकडल्या गेलेल्या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी व तसेच अक्षय भालेराव च्या कुटुंबीयना आर्थिक मदत शासनाकडून मिळावी अशा मागण्यांचा



निवेदन, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली आज माननीय तहसीलदार बाळासाहेब शिरसाठ यांना देण्यात आला.

याप्रसंगी तालुका अध्यक्ष चंद्रशेखर मडी खांबे जिल्हा उपाध्यक्ष देवानंद अस्वले जिल्हा संघटक मल्लिनाथ पाटील ,शिव,बसव डॉक्टर आंबेडकर सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदीप मडीखांबे, तालुका महासचिव नागेश हरवाळकर तालुका उपाध्यक्ष नरसिंह गायकवाड रमजान मुल्ला ,तालुका संघटक बबन गायकवाड श्याम बनसोडे, राम हल्ले,सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे तालुकाध्यक्ष रवी पोटे, युवक तालुका अध्यक्ष प्रकाश शिंदे, युवक आघाडी शहराध्यक्ष संदीप बाळ शंकर ,शहर उपाध्यक्ष राम बाळ शंकर, शहर महासचिव भारत देडे चंनु शिंगे,, युवक आघाडी तालुका महासचिव अरुण शिवशरण यल्लाप्पा बनसोडे,, बॅगेहळी शाखा अध्यक्ष गंगाराम गायकवाड,, युवक शहर महासचिव रोहित साळे, तालुका युवक आघाडी उपाध्यक्ष योगेश सोनकांबळे नागमूर्ति करणे,, शहर उपाध्यक्ष शिवाजीराव चौगुले राहुल हरवाल कर, आणि तालुका प्रसिद्धीप्रमुख संदीप गजदाने आधी पदाधिकाऱ्यांसह भरपूर प्रमाणात कार्यकर्ते उपस्थित होते